सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १ नोव्हेंबर २०२५

# पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेला प्रारंभ

## महाविद्यालयीन तरुणाईच्या सळसळत्या उत्साहात नाट्यजल्लोष



कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत शुक्रवारी विवेकानंद महाविद्यालयाने 'लेबल' ही एकांकिका सादर केली.

कोल्हापूर, ता. ३१ : महाविद्यालयीन तरुण कलाकारांच्या अभिनय कौशल्याला वाव देणाऱ्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेला आजपासून सळसळत्या उत्साहात प्रारंभ झाला. महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), गायन समाज देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाने ही स्पर्धा आयोजित केली आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात यानिमित्ताने तरुणाईचा नाट्यजल्लोष अनुभवायला मिळाला आहे.

स्पर्धेत रविवार (ता. २) पर्यंत २६ महाविद्यालयांचे संघ या एकांकिका सादर करणार आहेत. आज सकाळी नऊ वाजता स्पर्धेचे उद्‌घाटन महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेचे सचिव राजन ठाकूरदेसाई, शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, स्पर्धा समन्वयक मनीष आपटे, परीक्षक अनिरुद्ध



दिंडोरकर, गोपाळ जोशी आणि ज्ञानेश मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

सकाळच्या सत्रामध्ये व्यंकटेश महाविद्यालयाने 'मागे वळून बघू नकोस', विवेकानंद कॉलेजने 'लेबल' या एकांकिका सादर केल्या. सायंकाळच्या सत्रामध्ये डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज (सातारा), आर्टस् आणि कॉमर्स महाविद्यालय (नागठाणे), गोविंदराव मक्सेरिया विज्ञान महाविद्यालय (बेळगाव), डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक आणि राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय (इस्लामपूर) या महाविद्यालयांच्या एकांकिकांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उद्या (शनिवारी) स्पर्धेत ११ एकांकिका, तर रविवारी (ता. २) चार एकांकिका सादर होतील. सायंकाळी सहा वाजता पारितोषिक वितरण होणार आहे.

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'च्या कविन केंगनाळकर पॅरा-शूटिंगस्पर्धेत यश

कोल्हापूर : हॅलो प्रभात




विवेकानंद कॉलेज इयत्ता ११ वी चा विद्यार्थी कविन केंगनाळकर याने अल ऐन (यूएई) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पॅरा-शूटिंग स्पर्धेत १० मीटर एअर रायफल सांघिक गटात पहिले पदक जिंकून कोल्हापूर आणि भारताचा गौरव वाढवला आहे.

कविनच्या यशामागे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, तसेच प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रशिक्षक जीवन राय आणि जयप्रकाश नौटियाल यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५

# 'सीए' परीक्षेत कोल्हापूर विभागात आसिम प्रथम

## ३४ विद्यार्थी यशस्वी ; अन्य पूर्व परीक्षांमध्ये १२६ जण उत्तीर्ण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : चार्टर्ड अकाउंटंटस् (सीए)च्या अंतिम परीक्षेचा निकाल आज आयसीएआय (दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडिया)ने आज जाहीर केला. त्यात कोल्हापूरमधील ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कोल्हापूर विभागामधून आसिम मेमन याने प्रथम क्रमांक पटकविला. अभिमान माळी दुसरा, ऋतुराज दाबाडे तिसरा, तर सुष्मिता काटकर चौथी आली.

दरम्यान, देशातून मध्य प्रदेशमधील धामनोद येथील मुकुंद आगीवाल याने अंतिम परीक्षेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. हैदराबादमधील तेजस मुंदडा याने द्वितीय आणि राजस्थानातील अलवर येथील बकुल गुप्ता तृतीय आला.

'आयसीएआय'तर्फे सप्टेंबरमध्ये झालेल्या परीक्षा कोल्हापूरमधील २४९ विद्यार्थ्यांनी दिली. त्यातील ३४ जण यशस्वी झाले. त्यामध्ये चैत्रा मुदुमदार, श्रीकांत महाजन, आकांक्षा पाटील, प्रथमेश गोंगाणेकर, ऋषिकेश पोवार, नमिता गाडवे, पूनम उपाध्ये, रसिका पाटील, अपूर्व हजारे, दर्शनी तोडकर, साक्षी झंवर, दिगंबर पाटील, जान्हवी करमरकर, ओंकार सामंत, आदित्य काळेरेकर, राजकुमार मसवडे, श्यामसुंदर माळू, श्रुती गाट,

पान ७ वर >



कोल्हापूर : सीए अंतिम परीक्षेत यशस्वी झालेल्या आसिम मेमन याचे सोमवारी पेढा भरवून कौतुक करताना काका मसुद मेमन. शेजारी आजी खैरुनिसा.

# 'सीए' परीक्षेत कोल्हापूर विभागात आसिम प्रथम

> पान १ वरून

मानसी कर्ड्डी, ज्योतिबा पाटील, यश पाटील, प्रियांका सावंत, ईशा गाटे, जान्हवी पावसकर, संजना दयानी, मिथ गांधी, सूरज पाटील, तुषार घराळ, बिपाशा शेख, पूजा लटकन यांचा समावेश आहे. इंटरमेडिएट परीक्षेमध्ये कोल्हापूर विभागातून ५६४ विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थी, तर फाउंडेशन परीक्षेमध्ये ३५७ विद्यार्थ्यांपैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. दरम्यान, या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांवर नातेवाईक, मित्रमंडळींकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला. काहींनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

### रसायनशास्त्रामुळे विज्ञान नाकारले अन् 'सीए' झालो



अभिमान माळी



ऋतुराज दाबाडे

दहावीत असताना डॉक्टर बनायचे ठरविले, मात्र, रसायनशास्त्र आवडत नसल्याने विज्ञान शाखा नाकारून अकरावी वाणिज्य शाखेला प्रवेश घेतला. पुढे काका, आजी आणि कुटुंबीयांच्या इच्छेनुसार सीए व्हायचे म्हणून जिद्दीने तयारी केली आणि त्यात यशस्वी झाल्याचे आसिम मेमन याने सांगितले. तो म्हणाला, "मी सध्या शाहुपुरी परिसरात राहत असून मी मूळचा मालवणचा आहे. तेथे आमचा सुपर बझार आहे. मोठ्या भावाचा कोल्हापुरात हॉटेल व्यवसाय आहे. येथील छत्रपती शाहू विद्यालयात आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. दहावीत साठ गुण मिळाले. त्यावेळी डॉक्टर बनायचे स्वप्न होते. मात्र, कुटुंबीयांच्या इच्छेनुसार विवेकानंद महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. पुढे ९१ टक्क्यांसह बारावी उत्तीर्ण झालो आणि 'सीए'ची तयारी सुरू केली. बी. कॉम. पूर्ण केले. दररोज आठ ते दहा तास अभ्यास करत होतो. त्या जोरावर आणि कुटुंबीयांच्या पाठबळावर सीए परीक्षेत यशस्वी झालो. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी अभ्यासात सातत्य ठेवावे." दरम्यान, विभागात द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या अभिमान याने देखील बारावीनंतर सीए होण्याचा निर्धार केला. गेली साडेतीन वर्षे त्याने जिद्दीला अभ्यासातील सातत्याची जोड देत यश मिळविले आहे.



सुष्मिता काटकर

> काठिण्य पातळी अधिक असलेल्या सीए परीक्षेत कोल्हापूर विभागातील ३४ विद्यार्थ्यांनी यश मिळविण्याचा क्षण अभिमानाचा आहे. गेल्या तीन वर्षांत कोल्हापूरमधून दोनशेहून अधिक विद्यार्थी सीए झाले आहेत. सीए क्षेत्रातील या नव्या पिढीमुळे कोल्हापूरच्या प्रगतीला निश्चितच गती मिळेल.
>
> - नितीन हरगुडे, अध्यक्ष, आयसीएआय शाखा कोल्हापूर

तरुण भारत संवाद

मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये विधान परिषद शिक्षक मतदार नोंदणी

प्रतिनिधी

कोल्हापूर

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्यामध्ये शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. बापूजींच्या विचारांचा वसा आणि वारसा लाभलेल्या कौस्तुभ गावडे यांना विधान परिषदेत शिक्षक आमदार म्हणून विजयी करण्यासाठी जीवाचे रान करू, अशी ग्वाही कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे यांनी दिली. पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणीसाठी विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे आयोजित शिक्षकांच्या सहविचार सभेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. या काळात जास्तीत जास्त शिक्षक मतदार नोंदणी करावी, असे आवाहन केले.

सहविचार सभेमध्ये पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणीचे जिल्हाप्रमुख भूपाल कुमार यांनी जिल्ह्यात झालेल्या एकूण शिक्षक मतदार नोंदणीचा आढावा घेतला. पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी जुनी पेन्शन योजना, संचमान्यता, टप्पा अनुदान, पवित्र प्रणाली, शिक्षक पात्रता परीक्षा सक्ती न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे आश्वासन दिले. सभेस कोल्हापूर जिल्ह्यातील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, आजीव सेवक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित विधान परिषद पुणे विभाग शिक्षक मतदार नोंदणी सहविचार सभेत बोलताना श्रीराम साळुंखे.

PR 4.11.25

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥ - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

# SHRI SWAMI VIVEKANAND SHIKSHAN SANSTHA

2130, E ward, Tarabai Park, Kolhapur (Maharashtra)

(Affiliated to Shivaji University, Kolhapur and Savitribai Phule Pune University, Pune)

**(Permanently Granted)**

## WANTED

**Applications are invited from eligible candidates for the following posts :-**

| Name of the post / subject | Reservation |
|---|---|
| **1) Assistant Professor - No. of Post - 27**<br>Commerce- 02, Political Science- 01, Physics - 02, Chemistry- 03, Botany- 03, Zoology- 02, Mathematics - 01, Electronices- 03, Statistics- 03, English- 02, Marathi- 01, Sociology- 01, History- 01, Geography- 02 | Open - 10,<br>SC - 03,<br>ST - 03,<br>VJ - A- 01,<br>NT - B- 01,<br>NT - C- 01,<br>NT - D- 01,<br>OBC - 07,<br>EWS - 02,<br>SEBC - 04. |
| **2) Librarian - No. of Post - 09** | |
| **3) Director of Physical Education- No.of Post- * 06**<br>*01- Savitribai Phule Pune University, Pune | |

**Note** - For detailed information about posts, qualification and other terms and conditions, please visit following websites
1 www.vivekanandshikshansanstha.edu.in 2 www.unishivaji.ac.in

**Place : Kolhapur**

**Date : 05/11/2025**

**Secretary,**
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur

तरुण भारत संवाद
शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५

थोडक्यात महत्त्वाचे

# वंदे मातरम् १५० वर्षपूर्ती सोहळा विवेकानंद कॉलेजमध्ये उत्साहात

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजमध्ये 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त सामुहिक गीत गायनाचा सोहळा झाला. इन्स्टिट्यूटच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे याचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, वंदे मातरम गीत हे देशाची सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मतेची अस्मिता आहे. येत्या पिढ्यांना राष्ट्रप्रेमाचे संस्कार वंदे मातरम करीत राहील. विद्यार्थ्यांच्या समूहगायन देशभक्तीपर गीतांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. 'वंदे मातरम् – राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक' यावर निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. शिक्षण समूहाचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी म्हणाले, वंदे मातरम हा भारताचा अखंड ठेवा असून, पिढ्यानपिढ्या उदात्त ध्येय भावना जागृत करणारा दीपस्तंभ आहे. प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी देशभक्ती, एकता आणि राष्ट्रीय गौरव यांची जाणीव ठेवण्याचा संदेश दिला. मान्यवरांनी कॉरिडॉरमध्ये उभे राहून एकत्रितपणे 'वंदे मातरम्'चे गायन करून कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. साहिल जमादार आणि समन्वयक प्रा. सुरज गायकवाड यांनी संयोजन केले.

सकाळ TODAY
कोल्हापूर, सोमवार, १० नोव्हेंबर २०२५

# डॉ. प्रणिता मगदूम यांना पीएच.डी.पदवी


प्रणिता मगदूम

**माळगाव :** माळगाव (ता. पन्हाळा) येथील डॉ. प्रणिता प्रकाश मगदूम यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी.पदवी मिळाली. डॉ. प्रणिता यांनी 'नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करून नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये मल्टीफंक्शनल टेक्सटाईल' (बहुउद्देशीय कापड) विषयावर यशस्वीरीत्या संशोधन पूर्ण केले. प्रणिता यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माळगाव तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेजमध्ये पूर्ण केले. श्री हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे संस्थापक प्रकाश मगदूम यांच्या त्या कन्या आहेत. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व डॉ. के. के. शर्मा यांचे मार्गदर्शन मिळाले. पती गोरखनाथ पाटील, हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा संगीता मगदूम यांचे प्रोत्साहन मिळाले.

कोल्हापूर
रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५
• वर्ष : १ • अंक : ४६ • पाने : १० मूल्य ₹ ५
पो.र.नं. SGL/26/2025/2027 RNI No. MAHMAR/2003/11365
दैनिक जनप्रवास

# अंबाबाई देवीच्या खांद्यापर्यंत सूर्यकिरणे

जनप्रवास : कोल्हापूर

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात दक्षिणायन कालखंडातील किरणोत्सवाला आज (दि.९)पासून प्रारंभ होणार आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी तज्ज्ञांकडून किरणोत्सवातील अडथळ्यांची चाचणी करण्यात आली. गरूड मंडप उभारण्यापूर्वी सात दिवस किरणोत्सव झाला होता. आता गरूड मंडपाचे बांधकाम सुरू आहे. तरीही स्वच्छ वातावरण, अपेक्षीत आर्द्रता, हवेतील धुळीकण कमी असल्याने ५.४७ मिनिटांनी सूर्यकिरणे अंबाबाई देवीच्या खांद्यापर्यंत जाऊन डावीकडे लुप्त झाली. त्यानंतर देवीच्या आरती करण्यात आली.

किरणोत्सवासाठी हवामान निरभ्र असले तरी मार्गातील अडथळ्यांचे मोठे आव्हान आहे. दक्षिणायन आणि उत्तरायण अशा दोन कालखंडात किरणोत्सव होतो. यंदाचा दक्षिणायन कालखंडातील किरणोत्सव ९ ते १४ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. गतवर्षी किरणोत्सवातील अडथळे दूर करण्यासंदर्भात महापालिकेशी पत्रव्यवहार केला होता. परंतु अद्याप महापालिकेने किरणोत्सवातील अडथळे दूर केलेले नाहीत. किरणोत्सव चाचणीमध्ये शनिवारी सायंकाळी ५.५ वाजता सूर्यकिरणे महाद्वार रोडवर आली होती. त्यानंतर ५.७ वाजता गरूड मंडप पाठीमागे, ५.२३ गणपती मंदिरमागे, ५.२४ कासव चौक, ५.३१ पितळी उंबरा, ५.३५ चांदीचा उंबरा, ५.३८ संगमरवरी पहिली पायरी, ५.४० संगमरवरी तिसरी पायरी, ५.४२ अंबाबाई चरणस्पर्श, ५.४५ अंबाबाई देवीच्या गुडघ्यापर्यंत आली. ५.४६ मिनिटांनी अंबाबाई देवीच्या कमरेपर्यंत आली. त्यानंतर हळूहळू ५.४७ मिनिटांनी सूर्यकिरणे अंबाबाई देवीच्या खांद्यापर्यंत जाऊन डावीकडे लुप्त झाली.



कोल्हापूर : करवीर निवासिनी अंबाबाईच्या किरणोत्सव चाचणी दरम्यान शनिवारी देवीच्या खांद्यापर्यंत आलेल्या सूर्यकिरणांनी गाभारा प्रकाशमय झाला होता.

## ७५ हजार भाविकांनी घेतले अंबाबाईचे दर्शन

करवीर निवासिनी अंबाबाईच्या दर्शनासाठी शनिवारी पहाटेपासूनच रांगा लागल्या होत्या. शनिवार व रविवार शासकीय सुट्टी असल्याने शनिवारी अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभरात ७५ हजार १०६ भाविकांनी अंबाबाईचे दर्शन घेतले.

## स्वच्छ व निरभ्र आकाश

अंबाबाईच्या दक्षिणायन किरणोत्सवाला आजपासून प्रारंभ होणार आहे. शनिवारी किरणोत्सवाची चाचणी करण्यात आली. या चाचणी दरम्यान स्वच्छ व निरभ्र आकाश असल्याने किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होईल.

डॉ. मिलींद कारंजकर
(किरणोत्सव अभ्यासक, विवेकानंद कॉलेज)

तरुण भारत संवाद

रविवार, ९ नोव्हेंबर २०२५

# किरणोत्सव : सूर्यकिरणे अंबाबाईच्या खांद्यापर्यंत

प्रतिनिधी

कोल्हापूर

रविवारपासून सुरू होणाऱ्या करवीर निवासिनी अंबाबाईच्या किरणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी तिसऱ्यांदा पाहणी करण्यात आली. स्वच्छ वातावरण आणि ढगांचा अडथळा नसल्यामुळे ५ वाजून ४७ मिनिटांनी सूर्यकिरणांनी देवीच्या खांद्याला स्पर्श केला.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या पदार्थविज्ञान व खगोलशास्त्र विभागाच्या तज्ज्ञांकडून ही पाहणी झाली.

शनिवारी महाद्वार रोड कमानीजवळ ५.५ वाजता सूर्यकिरणे होती. गरुड मंडपाजवळ ५.७ वाजता, गणपती मंदिरामागे ५.२३, कासव चौकात ५.२९, पितळी उंबरठ्याजवळ ५.३१, चांदीच्या उंबरठ्याजवळ ५.३५, संगमरवरी पायरीजवळ ५.४० वाजता पोहोचली होती. तर ५ वाजून ४२ मिनिटांनी सूर्यकिरणांनी देवीचा चरण स्पर्श केला. त्यानंतर ५.४५ वाजता गुडघ्यापर्यंत, ५.४६ वाजता कमरेच्या वर पोहोचली. तर ५ वाजून ४७ मिनिटांनी



कोल्हापूर : अंबाबाईच्या किरणोत्सव चाचणीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी सूर्यकिरणे देवीच्या खांद्यापर्यंत पोहोचली.

देवीच्या खांद्याला सूर्यकिरणांनी स्पर्श केला. हा किरणोत्सव पाहण्यासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती.

पुढारी बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५

# निहाली पाटीलची निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील निहाली पाटीलची जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्या विद्यमाने तथा जिल्हा क्रीडा परिषद, रत्नागिरीमार्फत एस. व्ही. जे. सी. टी. क्रीडा संकुल, डेरवण येथे १९ वर्षांखालील मुले व मुली या राज्यस्तर शालेय टेबल टेनिस स्पर्धा झाल्या. स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने द्वितीय व मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्यासह क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

जनप्रवास बातम्यांचा राजा
• बुधवार
दि. १२ नोव्हेंबर २०२५

# मानव कल्याणासाठी मनशक्ती संस्थांची गरज

## शुभांगी गावडे यांचे प्रतिपादन: मनशक्तीकडून सुसंस्कारी पिढी घडवण्याचे काम

जनप्रवास : कोल्हापूर

मनशक्ती सारख्या संस्थांची व्यक्ती विकासातून मानव कल्याणासाठी गरज आहे, असे प्रतिपादन येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगीताई गावडे यांनी केले. लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग केंद्र आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या सहकार्याने यश शांती साठी न्यू वे या दोन दिवसीय कार्यक्रमाचा शुभारंभ प्राचार्या गावडे यांच्या हस्ते करण्यात आला.

संवेदनशील , कार्यक्षम, सृजनशील पिढी घडवण्यासाठी योग्य वयात संस्कार करणे गरजेचे आहेत. मनशक्ती केंद्र व्यापक



मनशक्ती प्रयोग केंद्र आयोजित यश शांतीसाठी न्यू वे उपक्रमाच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी दीपप्रज्वलन करताना प्राचार्या शुभांगीताई गावडे प्राचार्य डॉ. रमेश कुंभार, प्रमोदभाई शिंदे, गीतेश कुलकर्णी

संशोधनातून व्यक्ती विकासातून राष्ट्र आणि मानव कल्याणासाठी जे काम करत आहे. यावेळी डॉ. रमेश कुंभार यांचे भाषण झाले.

केंद्राचे कार्यकारी विश्वस्त प्रमोद शिंदे यांनी मनशक्ती व्यक्ती, कुटुंब, राष्ट्र मानवता कल्याणासाठी सशक्त, सुसंस्कारी पिढी घडवण्याचे काम करत असल्याचे सांगितले.

यामध्ये निराधार एक पालकत्व स्थलांतरीत गरीब गरजू मुले यांच्या शिक्षणाबद्दल काम करणारी संस्था उमेद फाऊंडेशन सोनरूळ आणि बौद्धिक अक्षम मुलांसाठी तसेच अन्य दिव्यांग मुलांसाठी तसेच महिला सक्षमीकरणासाठी काम करणारी संस्थाशाम कमल चॅरिटेबल ट्रस्ट या दोन संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. या केंद्राचे साधक दीपक आलुरकर, गीतेश कुलकर्णी, मयूर चंदने, सुहास गुप्टे, कोल्हापूरचे साधक शिवाजी पाटील यांच्यासह १०० हून अधिक साधक कार्यरत आहेत.

12.11.25

12.11.25

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'च्या कु.निहाली पाटील ची टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर : हॅलो प्रभात



रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या मुलींच्या संघाने द्वितीय, तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेतून इयत्ता ११ वी सायन्सची कु. निहाली निवास पाटील हिची जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.संघातील खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, तसेच प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. संतोष कुंडले, डॉ. विकास जाधव व जिमखाना विभागातील प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक
जनप्रवास
बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५

# डॉ. कुंभार हे माणसांना घडविणारे व्यक्तिमत्व

## स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापक व प्राचार्य म्हणून ३९ वर्षे सेवा बजावणारे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कराड, कडेपूर, सातारा, तासगाव, इचलकरंजी आणि विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे आपल्या उत्तम प्रशासनाच्या जोरावर आणि दूरदृष्टीतून येथील महाविद्यालयांचा विकास केला. माणसांना जपणारे आणि घडविणारे व्यक्तिमत्व म्हणून प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांना ओळखले जाते, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या सेवागौरव सदिच्छा समारंभात ते बोलत होते.

विवेकानंद कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा शाल, श्रीफळ, मानपत्र, आहेर, श्री महालक्ष्मीची मूर्ती देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी साळुंखे म्हणाले, स्थिर, चिकाटी, आत्मविश्वास, सहनशीलता, विनम्रता, उत्तम नेतृत्व गुण, हाडाचे शिक्षक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, प्राचार्य, उत्तम प्रशासक, व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांची जाण, कौटुंबिक सुखदु:खात आधार देणारे आधारवड, शिस्तप्रिय, महत्वाकांक्षी असे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे.

विवेकानंद कॉलेजला यशाच्या शिखरावर पोहोचविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्राचार्य डॉ. कुंभार यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. वी. एम. हिर्डेकर यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा विचार अंगिकारुन प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी प्रशासनात आपला ठसा उमटविला आहे. त्यांनी शैक्षणिक गुणवत्तेच्या वाढीबरोबरच महाविद्यालयांचा भौतिक विकास करण्यावरसुद्धा भर दिला. माणसं पारखण्याची दूरदृष्टी त्यांना लाभली आहे.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार म्हणाले, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमुळे माझी ओळख निर्माण झाली आहे. मला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा खंबीर पाठिंबा होता. त्यामुळेच शिक्षणक्षेत्रात मुक्तपणे यशस्वी वाटचाल करू शकलो. संस्थेने ज्या ज्या ठिकाणी मला सेवेची संधी दिली, त्या शाखांचा परिपूर्ण अभ्यास करून तेथील शैक्षणिक व भौतिक सुविधांचा विकास केला.

संस्थेच्या कोल्हापूर जिल्ह्याचे विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ.सतिश घाटगे, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष हितेंद्र साळुंखे, प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, माजी आमदार भगवानराव साळुंखे, प्रा. जे. के. पाटील, डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. डी. आर. तुपे, प्रा. एम. आर. नवले, डॉ. वर्षा शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. एस. पी. थोरात यांनी केले. आभार प्रा. शिल्पा भोसले यांनी मानले.

सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. मानपत्राचे वाचन प्रा. अविनाश गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमाला शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सेवागौरव सदिच्छा समारंभात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा सत्कार करताना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत डॉ. वी. एम. हिर्डेकर आदी.

दैनिक जनप्रवास बहुजनांचा राजा

● गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजचा व्हॉलिबॉल स्पर्धेतील विजेता संघ.

# झोनल पुरुष व्हॉलिबॉल स्पर्धेत विवेकानंद कॉलेज तृतीय

जनप्रवास : कोल्हापूर

विवेकानंद महाविद्यालयातील शिवाजी विद्यापीठ झोनल पुरुष व्हॉलिबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय संघ तृतीय ठरला. महाविद्यालयाच्या संघाची कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी येथे होणाऱ्या इंटरझोनल व्हॉलिबॉलसाठी निवड झाली. खेळाडूंचे यशस्वी अभिनंदन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

---

# 'विवेकानंद'मध्ये कायदेविषयक कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत कायदेशीर बाबींचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर सचिव डी. ए. डोईफोडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी पोस्को व मुलींच्या लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डी. आर. पाटील यांनी केले. आभार प्रा. एम. आर. नवले यांनी मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. यावेळी प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा एल. एस. नाकाडी, प्रा. पी. एन. कांबळे, प्रा. एच. जी. पाटील होते.

पुण्य नगरी
गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजचा इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेत विजय

## शिवाजी विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत १२० खेळाडूंचा सहभाग



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत घेण्यात आलेल्या इंटरझोनल टेबल टेनिस मुले व मुलींच्या स्पर्धांचे आयोजन विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये करण्यात आले होते. या स्पर्धेत सातारा, सांगली, कोल्हापूर या तिन्ही विभागांतील एकूण ६० मुले व ६० मुली असे एकूण १२० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धा साखळी फेरीतून बाद पद्धतीने खेळवण्यात आल्या. अंतिम सामना विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर विरुद्ध के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर यांच्यामध्ये झाला. यामध्ये विवेकानंद कॉलेजने ५-३ ने के.आयटी. कॉलेजवर विजय मिळवून विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेचे उद्घाटन व बक्षीस समारंभ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते पार पडला. या स्पर्धेमधून गुजरात येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा मुला-मुलींच्या टेबल टेनिस संघाची निवड करण्यात आली. याप्रसंगी निवड समितीचे अध्यक्ष डॉ. दीपक डांगे-पाटील, प्रा. किरण पाटील, प्रा. योगिता परमाणे, स्पर्धा निरीक्षक रुद्रेश मल्लाप्पा हे उपस्थित होते.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कोबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पुण्य नगरी | गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५



# विवेकानंद कॉलेजचा व्हॉलीबॉल संघ तृतीय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर झोनल पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. या कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या संघाची कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी येथे होणाऱ्या इंटरझोनल व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे आणि सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि सुरेश चरापले यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. महाविद्यालयात या यशाबद्दल खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले असून, इंटरझोनल स्पर्धेतही त्यांनी आणखी चांगली कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

तरुण भारत संवाद | शुक्रवार | दि.१४ नोव्हेंबर २०२५

# दोनशे वर्षानंतरची संधी घालवली

## कमानीतील रचना थोडी बदलल्यास विनाअडथळा होणार किरणोत्सव : अभ्यासकांचे मत

- अंबाबाई गरूड मंडप आणि किरणोत्सवातील अडथळा
- मंडपाच्या नव्याने होणाऱ्या कामात दुरूस्तीची गरज
- ५ दिवसाचा किरणोत्सव सध्या ७ दिवसांवर आला

**करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या मूळ मंदिरासमोरील असलेला गरूड मंडप उतरवल्याने त्यानंतरचे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने आणि दोन दिवस जास्त झाले आहेत. त्यामुळे गरूड मंडपाचे नव्याने होत असलेले बांधकाम होण्यापूर्वी मंडपाच्या कमानीची रुंदी वाढवणे गरजेचे असल्याचे मत अभ्यासक व्यक्त करत आहेत. तब्बल २०० वर्षानंतर गरूड मंडप उतरवला आहे. आता संधी आहे तर कमानीची रचना थोडी बदलली की किरणोत्सवातील हा अडथळा कायमचा दूर होणार आहे. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने याचा विचार करावा, अशी मागणी होत असली तरी पुरातत्व विभागाच्याला राजी होत नसल्याची चर्चा आहे.**



दीपक जाधव
कोल्हापूर

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरातील वर्षातून दोनदा होणाऱ्या किरणोत्सवात येत असलेल्या अडथळ्यांमध्ये गरुड मंडप कमानीचा देखील एक अडथळा आहे. कोणत्याही कारणाने गरुड मंडप उतरवला असला तरी आता त्यामुळे किरणोत्सव पूर्ण क्षमतेने आणि एक दिवस आधी आणि एक दिवस नंतर होत आहे. पाच दिवसांचा किरणोत्सव ७ दिवसांवर आला आहे. फेब्रुवारीमध्ये आणि आता देखील सुरू असलेल्या किरणोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी प्रखर सूर्यकिरणे देवीच्या चेहऱ्यापर्यंत गेली आहेत. हा गरुड मंडप उतरवल्याचा परिणाम आहे. आता गरुड मंडपाचे नव्याने बांधकाम होत आहे. कमानीची रचना थोडीशी बदलण्याची हीच संधी आहे. कमान थोडी रुंद केली तरी हा अडथळा दूर होणार आहे. याचा देवस्थान समितीने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी अभ्यासकांनी केली आहे.

### तारखांमध्ये झाला बदल

किरणोत्सवाच्या तारखांमध्ये काळानुरूप थोडा बदल झाला आहे. दक्षिणायन म्हणजेच नोव्हेंबरमधील किरणोत्सवाच्या तारखा दोन

तरुण भारत विशेष

दिवसांनी पुढे गेल्या आहेत. हा सोहळा ९ ते १३ नोव्हेंबरदरम्यान होत आहे. उत्तरायण किरणोत्सव २ दिवस आधी, २९ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान होत आहे. मात्र या दरम्यान किरणोत्सव पूर्ण क्षमतेने होत आहे.

अडथळा ठरणारे दोन खांब उभारताना त्याचा बदल करण्यास पुरातत्व विभागाने नकार दिला आहे. श्री अंबाबाई मंदिर परिसरात उभारण्यात येत असलेल्या गरुड मंडपाच्या दोन खांबांचा गेली कित्येक वर्षे अंबाबाईच्या

### कामावेळीच नकार का?

दोन खांब एक-एक फुटांनी मागे सरकवायचे होते. त्यामुळे मंडपाच्या रचनेत कोणताही बदल होणार नव्हता. मंडप उभारण्याआधी देवस्थान समितीने हा विषय पुरातत्व विभागाला कळवून खांब एक फुटाने सरकवण्यास सांगितले होते, त्यावेळी पुरातत्व विभागाने देखील त्याला होकार दिला होता. पण आता कामावेळीच नकार दिल्याचे समितीकडून समजते.

> गरुड मंडपाच्या ज्या दोन खांबांचा किरणोत्सव मार्गातील अडथळा हा गेल्या कित्येक वर्षांच्या अभ्यासाअंती स्पष्ट झाला. नव्याने गरुड मंडपाची उभारणी होत असताना त्या खांबाची रुंदी महाद्वारच्या रुंदीप्रमाणे करण्यासाठी देवस्थानला कळवले होते. तसे देवस्थानने पुरातत्व विभागाला कळवले होते. मात्र त्यात बदल न करता मंडपाची उभारणी सुरू आहे.
>
> **- मिलींद कारंजकर, पदार्थविज्ञान, खगोल शास्त्र विभाग अॅडजंक्ट प्रोफेसर, विवेकानंद महाविद्यालय**

> किरणोत्सवामध्ये गरुड मंडपाच्या खांबांचा अडथळा असल्याचे काही अभ्यासक,नागरिकांनी देवस्थानला सांगितले होते. तसे देवस्थानने पुरातत्व विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यांना कळवले होते. मात्र पुरातत्व विभागाने त्यात बदल करायला स्पष्ट नकार दिला.
>
> **- शिवराज नाइकवाडे, सचिव, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती**

किरणोत्सवात अडथळा येत आहे. समोरचे हे दोन खांब फक्त एक- एक फुटाने सरकवल्यास पूर्ण क्षमतेने किरणोत्सव होऊन सात दिवसांचा किरणोत्सव सोहळा होणार आहे. पण सध्या गरुड मंडपाचे काम सुरू आहे. तोपर्यंतच त्यात बदल होणे गरजेचे आहे. तब्बल २०० वर्षांनी ही बदलाची संधी आयती चालून आली होती. मात्र पुरातत्व विभागाकडून त्यासाठी नकारघंटा वाजवली जात आहे. पण जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले तर हा बदल होऊ शकतो. अंबाबाई मंदिरातील गरुड मंडपाचे खांब बसवले जात आहेत. अगदी समोरच्या बाजुला असलेले दोन खांब कायमच अंबाबाईच्या किरणोत्सवात अडथळा ठरायचे. मात्र दोन वर्षांपासून गरुड मंडप नसल्याने अंबाबाईचे वर्षातून दोन वेळा होणारा किरणोत्सव सात दिवस आणि प्रखर सूर्यकिरणांसह होत आहे.



पुण्य नगरी | ५ | शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५



# 'विवेकानंद 'च्या बॅडमिंटन संघांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाबाई डिफेन्स बॅडमिंटन अॅकॅडमी येथे झालेल्या कोल्हापूर झोनल महिला आणि पुरुष बॅडमिंटन स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाच्या महिला व पुरुष संघांनी दमदार कामगिरी करून सुवर्णपदक पटकावले. या दोन्ही संघांनी अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इंटरझोनल स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. या खेळाडूंना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक
जनप्रवास बातम्यांचा राजा
• शनिवार
दि. १५ नोव्हेंबर २०२५

# गीतांजली साठे यांचे एमपीएससी परीक्षेत यश

## • पाचहून अधिक स्पर्धा परीक्षांमध्ये यशाचा चढता आलेख कायम

**जनप्रवास : कोल्हापूर**

गीतांजली गोपाळ साठे रा.मल्हारपेठ (सध्या रा.फुलेवाडी) यांनी एमपीएससीच्या २०२४ च्या परीक्षेत लखलखीत यश संपादन केले. राजपत्रित वर्ग एक अधिकारी पदी त्यांनी गवसणी घातल्याबद्दल पंचक्रोशीतून त्यांचे कौतूक होत आहे. मुख्याध्यापक गोपाळ आकाराम साठे यांच्या त्या कन्या होत.



गीतांजली साठे यांचे प्राथमिक शिक्षण तारळे, तालुका पाटण येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा सयाजीराव हायस्कूल, सातारा येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेजमध्ये झाले. पुढे त्यांनी शासकीय इंजीनियरिंग कराड येथून मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी प्राप्त केल्यानंतर विद्या प्रबोधिनी अकॅडमी कोल्हापूरमध्ये एमपीएससी या स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकची पोस्ट मिळवली. त्यानंतर यशाचा आलेख सदैव चढताच राहिला. पुढे विक्रीकर निरीक्षक, अन्न औषध प्रशासन (फूड इन्स्पेक्टर), कर निर्धारण, प्रशासकीय अधिकारी गट अ नगरपरिषदा आदी एकापेक्षा एक सरस अशा स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक हे पद निवडले व ठाणे येथे रुजू झाल्या. पण राजपत्रित वर्ग एक अधिकारी पद मिळवावयाचे त्यांचे ध्येय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. दरम्यानच्या कालावधीत लग्न झाल्यानंतरही त्यांनी दररोज नोकरी व संसार सांभाळत अभ्यासाचा धडाका सुरूच ठेवला. अखेर अथक प्रयत्नातून त्यांनी एमपीएससीच्या २०२४ परीक्षेमध्ये यश प्राप्त केले.

त्यांचे पती पीएसआय म्हणून मुंबई येथे कार्यरत आहेत. वडील मुख्याध्यापक गोपाळ साठे हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या दि इंग्लिश स्कूल चंदुर या शाळेतून सेवानिवृत्त झाले आहेत. आई गृहिणी आहेत. त्यांचा भाऊ आशिष साठे यांनीही स्पर्धा परीक्षेतून इंटेलिजिन्सियंट ब्युरोमध्ये नोकरी मिळवली असून ते कार्यरत आहेत. साठे यांना त्यांचे आई-वडील व पतीकडून राजपत्रित वर्ग एक अधिकारी पद मिळवण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले. आपले यश हे अहोरात्र कष्ट, निरंतर वाचन चिकाटी, धाडस, व श्रेष्ठांचे मार्गदर्शन यातून मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

सकाळ

रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

# तणावमुक्त जीवन हाच सुखी जीवनाचा मूलमंत्र : डॉ. पाटील

## 'विवेकानंद'मध्ये शिक्षक सक्षमीकरणावर कार्यशाळा



डॉ. संजीवकुमार पाटील

कोल्हापूर, ता. १५ : 'तणाव मुक्त जीवन हाच खरा सुखी जीवनाचा मूलमंत्र असून, काम, क्रोध, लोभ, मद-मत्सर यावर ज्याला नियंत्रण करता येईल, तो मनुष्य जगात सुखी असेल,' असे प्रतिपादन मनशक्ती केंद्राचे डॉ. संजीवकुमार पाटील यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत 'शिक्षक सक्षमीकरण' या विषयावर ते बोलत होते.

त्यांनी महाभारतातील विविध पात्र स्वरूप व्यक्तीच्या स्वभावानुसार असणारे गुण आणि दोष याच्यावरती मार्गदर्शन करताना माणसाने सुखी समृद्ध आयुष्य जगण्यासाठी कोणत्या गोष्टी आत्मसात कराव्यात हे सांगितले. ते म्हणाले, 'जगात व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात. शिक्षकाला कुटुंब आणि कार्यक्षेत्र यांच्यात समतोल साधता आला पाहिजे, कोणतेही काम करताना ते आवडीने केले, तर त्याच्यात आनंद मिळतो आणि केलेल्या कामाचे समाधान मिळवता येते.'

समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले. डॉ. कविता तिवडे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, १६ नोव्हेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत कायदेशीर बाबींची माहिती व्हावी म्हणून कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. यास ज्युनिअर आर्टस्, कॉमर्स व सायन्समधील विद्यार्थी, विद्यार्थिनींचा प्रतिसाद लाभला. शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश डी. ए. डोईफोडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी पोस्को कायदा व मुलींच्या लैंगिक अत्याचार प्रतिबंधक माहिती दिली. प्रा. डी. आर. पाटील यांनी स्वागत केले. मध्यम विभागप्रमुख प्रा. एस. आर. नवले यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्युनिअर आर्टस् कॉमर्स विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले, स्टाफ सेक्रेटरी प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. एल. एस. नाकाडे, प्रा. पी. एन. कांबळे, प्रा. एच. डी. पाटील आदी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास
● रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंदची बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी



विजेत्या संघाचा सत्कार करताना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे.

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व गोखले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाबाई डिफेन्स बॅडमिंटन अकॅडमी येथे झोनल महिला व पुरुष बॅडमिंटन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत विवेकानंदच्या महिला व पुरुष बॅडमिंटन संघाने सुवर्णपदकाची कमाई केली.

आष्टा येथे अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे होणाऱ्या अंतर्गत इंटरझोनल महिला व पुरुष बॅडमिंटन स्पर्धेकरिता या संघाने स्थान निश्चित केले. यशस्वी खेळाडूंना विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास

● मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५

# झोनल, इंटर झोनल स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेज उपविजेता

## • शिक्षण क्षेत्रातून कौतुक



कोल्हापूर : मैदानी स्पर्धेमध्ये कोल्हापूर झोन व इंटरझोन उपविजेतेपद चॅम्पियनशिप मिळवलेला विवेकानंदचा संघ.

जनप्रवास : कोल्हापूर

झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या महिला संघाने विविध खेळ प्रकारांमध्ये यश मिळवून कोल्हापूर झोन व इंटरझोन उपविजेतेपद चॅम्पियनशिप मिळवली. याबद्दल त्यांचे शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धांच्या संघामध्ये रिया पाटील, झोनल मैदानी स्पर्धेमध्ये ४०० मीटर धावणे गोल्ड मेडल तर इंटरझोनल ४०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये ५६.७५ इतक्या वेळेमध्ये स्पर्धा पूर्ण करून सुवर्णपदक मिळवले. त्याचबरोबर मैदानी महिला गटामध्ये वैयक्तिक चॅम्पियनशिप मिळवून ती सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. तितिक्षा पाटोळे हिने झोन १०० मीटर धावणे गोल्ड मेडल, २०० मीटर धावणे गोल्ड मेडल, इंटरझोनल १०० मीटर धावणे गोल्ड मेडल तर २०० मीटर धावणे ब्रॉझ मेडल मिळविले. तन्वी जमसांडेकरने झोन २०० मीटर सिल्वर, तिहेरी उडी ब्रॉझ मेडल, तर इंटरझोनल स्पर्धेमध्ये तिहेरी उडी सिल्वर मेडल प्राप्त केले. रितिका मगदूमने झोनल स्पर्धेमध्ये लांब उडी गोल्ड मेडल, १०० मीटर ब्रॉझ मेडल, तर इंटरझोनल स्पर्धेमध्ये लांब उडी गोल्ड मेडलइंटरझोनल स्पर्धेमध्ये लांब उडी गोल्ड मेडल मिळविले.

गौरी भारतीने झोन व इंटरझोन थाळीफेक क्रीडाप्रकारात सिल्वर मेडल मिळविले. सानिका बोडकेने १०० मीटर हर्डल्स ब्रॉझ मेडल प्राप्त केले. श्रावणी जाधवचा रिले संघात समावेश. तसेच या संघाने झोनल स्पर्धेत ४ × १०० मीटर रिले गोल्ड मेडल तर ४ × ४०० मीटर रिले गोल्ड मेडल मिळवले. तसेच इंटरझोनल स्पर्धेत ४ × १०० मीटर रिले गोल्ड मेडल प्राप्त केले. सर्व यशस्वी खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के धनवडे, सुरेश परापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५

# मैदानी स्पर्धेत 'विवेकानंद'चा महिला संघ उपविजेता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या महिला संघाने उपविजेतेपद पटकावले. विविध क्रीडा प्रकारांमधील उल्लेखनीय यशामुळे या संघाचे कौतुक होत आहे.

या संघातील रिया पाटील (एम.एस्सी. सीएस १) हिने झोनल स्पर्धेतील ४०० मीटर धावण्यात सुवर्णपदक मिळवले. इंटरझोनल स्पर्धेतही ४०० मीटर धावणे केवळ ५६.७५ सेकंदांत पूर्ण करत सुवर्णपदकासह वैयक्तिक चॅम्पियनशिप पटकावून सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. तितिक्षा पाटोळे (बी.ए. २) हिने झोनल १०० मीटर व २०० मीटर धावण्यात प्रत्येकी सुवर्णपदक मिळवले. इंटरझोनलमध्ये १०० मीटर सुवर्ण, तर २०० मीटर धावण्यात कास्यपदक मिळवले. तन्वी जमसांडेकर (बी.बी.ए. ३) हिने झोनल २०० मीटर रौप्य, तिहेरी उडीत कास्य, तर इंटरझोनल तिहेरी उडीमध्ये रौप्यपदक पटकावले. रितिका मगदूम (एम.ए. २) हिने झोनल लांब उडीत सुवर्ण, १०० मीटरमध्ये कास्य, तसेच इंटरझोनल लांब उडीत सुवर्णपदक मिळवले. गौरी भारती (बी.एस्सी. ३) हिने झोन व इंटरझोन दोन्ही स्पर्धांमध्ये थाळीफेक प्रकारात रौप्यपदके जिंकली. सानिका बोडके (बी.एस्सी. १) हिने १०० मीटर हर्डल्समध्ये कास्यपदक मिळवले. श्रावणी जाधव (बी.कॉम. १) हिचा रिले संघात सहभाग होता.

महिला संघाने झोनल ४ बाय १०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले धावण्यात सुवर्णपदके मिळवली. इंटरझोनल स्पर्धेतही ४ बाय १०० मीटर रिले संघाने सुवर्णपदक पटकावले. या यशस्वी खेळाडूंना विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन मिळाले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

४ पुण्य नगरी ■ बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# गीतांजली साठे यांची अधिकारीपदाला गवसणी



सुळे : मल्हारपेठ (ता. पन्हाळा) येथील गीतांजली गोपाळ साठे (सध्या रा. फुलेवाडी) यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२४ परीक्षेत यश संपादन केले. कष्ट, जिद्द, चिकाटी, धाडस, निरंतर वाचनाच्या जोरावर राजपत्रित वर्ग १ अधिकारीपदी गवसणी घातली. त्याबद्दल पंचक्रोशीतून त्यांचे कौतुक होत आहे. गीतांजली साठे यांचे प्राथमिक शिक्षण तारळे, ता. पाटण जि. प. शाळेत झाले. माध्यमिक महाराजा सयाजीराव हायस्कूल सातारा येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरमध्ये झाले. पुढे त्यांनी शासकीय इंजिनिअरिंग कराड येथून मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी प्राप्त केल्यानंतर विद्या प्रबोधिनी ॲकॅडमीमध्ये स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी सहायक मोटर वाहन निरीक्षकचे पद मिळवले. पुढे विक्रीकर निरीक्षक, अन्न औषध प्रशासन, करनिर्धारण, प्रशासकीय अधिकारी गट अ नगरपरिषदा आदी एकापेक्षा एक सरस अशा स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक हे पद निवडले व ठाणे येथे रुजू झाल्या.

पुण्यनगरी ५ | बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# 'विवेकानंद 'कडून मोरजाई पठारावर जैवविविधता अभ्यास

## विद्यार्थ्यांकडून ३० किलो प्लास्टिक कचरा संकलन; पर्यावरणपूरक उपक्रमाला प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या आर्टस्-कॉमर्स विभागामार्फत 'पर्यावरण शिक्षण आणि जलसुरक्षा' या विषयांतर्गत 'जैवविविधता अभ्यास व प्लास्टिक कचरा संकलन' हा उपक्रम गगनबावडा येथील मोरजाई पठारावर राबवण्यात आला. सह्याद्री पर्वतरांगेतील जैवविविधतेने नटलेले हे पठार दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकर्षित करत असते; मात्र वाढत्या प्लास्टिक कचऱ्यामुळे या परिसरावर प्रदूषणाचे संकट निर्माण झाले आहे. त्यावर नियंत्रण व जैवविविधतेचा प्रत्यक्ष अभ्यास या उद्देशाने विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.



बारावी आर्टस्-कॉमर्स वर्गातील ४१ विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी प्रत्यक्ष भटकंती करत येथील वनस्पती, पक्षी, प्राणी, कीटक यांचा अभ्यास केला. पर्यावरण विषय शिक्षक अनिल घस यांनी जैवविविधतेचे महत्त्व, पर्यावरणीय बदल व धोके याबाबत मार्गदर्शन केले. कचरा नियंत्रणासाठी विद्यार्थ्यांचे दहा गट तयार केले. प्रत्येक गटाला प्लास्टिक संकलनासाठी मोठी पिशवी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी पाण्याच्या बाटल्या, अन्न पदार्थांच्या वेष्टन, पेले, चपला, कॅरी पिशव्या आदी सुमारे ३० किलो कचरा संकलन केले.

हा उपक्रम विभागप्रमुख शिल्पा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांचे सहकार्य लाभले. पी. वाय. राठोड, एस. एन. डर्गे, नयना पाटील, संतोष कोले, स्टाफ सेक्रेटरी बी. एस. कोळी आदींनी सहकार्य केले.

पुढारी बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजकडून मोरजाई पठार येथे प्लास्टिक कचरा संकलन उपक्रम

कोल्हापूर : विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या आर्टस्- कॉमर्स विभागामार्फत पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा विषयाअंतर्गत 'जैवविविधता अभ्यास व प्लास्टिक कचरा संकलन' उपक्रम मोरजाई पठार, गगनबावडा परिसरात राबविण्यात आला. पर्यावरणपूरक उपक्रमामध्ये अकरावी आर्टस्, कॉमर्सचे ४१ विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. पर्यावरण विषय शिक्षक अनिल घस यांनी जैवविविधता वैशिष्ट्ये, त्याचे पर्यावरणीय महत्त्व, सद्यस्थिती व धोके याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मोरजाई पठार परिसरामध्ये भटकंती करत येथील विविध वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक यांचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांनी येथील नैसर्गिक अधिवासाच्या नोंदी घेत छायाचित्रण केले. येथे मोठ्या प्रमाणात होत असलेल्या प्लास्टिक कचरा प्रदूषण नियंत्रणासाठी येथील झाडाझुडपात टाकलेला प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. उपक्रमाचे आयोजन विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पर्यवेक्षक पी. वाय. राठोड, प्रा. एस. एन. डगे, प्रा. एन. एस. पाटील, पर्यावरण विषय शिक्षक ए. आर. घस, संतोष कोळे यांनी सहभागी होऊन उपक्रम यशस्वी केला.

२ पुण्यनगरी ▮ बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'ॲनालिटिकल टेक्निक्स ॲप्लिकेशन इन फार्मासिटिकल ॲनालिसिस ॲंड क्वालिटी कंट्रोल' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

न्यू कॉलेज क्लस्टर अंतर्गत आयोजित या कार्यशाळेत विवेकानंद महाविद्यालयासह न्यू कॉलेज, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज, छत्रपती शाहू कॉलेज या महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ व दुपारच्या सत्रात डॉ. रवींद्र गायकवाड (भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेज) व डॉ. अजित एकल (इन्स्टा व्हिजन, सातारा) यांनी विद्यार्थ्यांना औषधनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या विश्लेषणात्मक तंत्रज्ञानाचे महत्त्व, औषधांचे रासायनिक पृथ्थकरण, दर्जा नियंत्रित ठेवण्याची प्रक्रिया, तसेच या क्षेत्रातील उपलब्ध रोजगार संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्र. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. एस. डी. शिर्के, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

19/11/25

तरुण भारत संवाद
गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५

# विवेकानंदचा अनिकेत उंच उडीत द्वितीय

- शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाचा एम.ए. भाग १ मध्ये शिकत असलेला विद्यार्थी अनिकेत माने याने उंच उडी खेळ प्रकारात झोनल व इंटरझोनल मैदानी स्पर्धेमध्ये दोन सिल्वर मेडल मिळवले. पुढे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी तो पात्र ठरला.

त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस.पी.थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

hThorat
20-11-2025

पुण्यनगरी ५ । शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५

# आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूरकर पाचवा

कोल्हापूर : नाशिक येथील



पंचवटी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय खुल्या क्लासिकल रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाचा बी.कॉम. भाग- १ मधील विद्यार्थी ऋषीकेश कबनूरकरने उल्लेखनीय कामगिरी केली. आठ फेऱ्यांत खेळताना दुसऱ्या बोर्डवर ७ गुणांची कमाई करून खुल्या गटात पाचवा क्रमांक पटकावून त्याने ५१.६ रेटिंगची भर घातली.

या स्पर्धेत फिडे मानांकित ९१ सह २३६ खेळाडूंनी सहभाग घेतला. ऋषीकेश हा दाभोळकर कॉर्नर येथील अनुज अॅकॅडमीत सराव करतो. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• शुक्रवार
दि. २१ नोव्हेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजचा पुण्यात सन्मान

## एन.एस.एस. मार्फत पूरग्रस्तांना भरीव मदत केल्याची घेतली दखल

जनप्रवास : कोल्हापूर

संकटातून संकल्पाकडे यानुसार विवेकानंद कॉलेजमधील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. विभागामार्फत पूरग्रस्तांना भरीव मदत करण्यात आली होती. या बद्दल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांचे हस्ते मॉडर्न कॉलेज, पुणे येथे विवेकानंद कॉलेजला सन्मान करण्यात आला.



पूरग्रस्तांनाभरीव मदत केल्याबद्दल मंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते सन्मान स्विकारताना संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात आदी.

अतिवृष्टीने मराठवाडा विभाग व सोलापूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले होते. या परिस्थितीत उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत विवेकानंद कॉलेजने पूरग्रस्तबाधित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा दत्तक घेतले. विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान त्याचप्रमाणे समाजाला पुन्हा उभारी देण्यासाठी महाविद्यालयाच्या सर्व घटकांनी विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाने पूरग्रस्तांना मदतीसाठी केलेल्या आवाहनानुसार शैक्षणिक साहित्य, कपडे व प्रवास खर्चासाठी विद्यार्थ्यांच्या खात्यावर रोख रक्कम, खाद्य पदार्थ व आर्थिक मदतीद्वारे संकलीत करुन दत्तक दिलेल्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथे मदत पोहोचवण्यात आली. शिक्षक, प्रशासकीय सेवक व स्वयंसेवक विद्यार्थ्यांच्या योगदानामुळे विवेकानंद कॉलेजला उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत संकटातून संकल्पाकडे या कार्यक्रमात स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ संदीप पाटील, डॉ. ए. एस. कुंभार, डॉ. पी. आर. बागडे, डॉ. ए. एस. महात यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या उपक्रमासाठी शिक्षक, प्रशासकीय सेवक, सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे सहकार्य लाभले.

हॅलो प्रभात




# विवेकानंद कॉलेजचा पुण्यात सन्मान

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पुरग्रस्तांना एनएसएस व एनसीसीमार्फत केलेल्या भरीव मदतीबद्दल विवेकानंद कॉलेजचा सन्मान मॉडर्न कॉलेज, पुणे येथे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील, संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते झाला. अतिवृष्टीग्रस्त करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय दत्तक घेऊन साहित्य, कपडे, आर्थिक मदत व आवश्यक सुविधा विवेकानंद कॉलेजकडून पुरविण्यात आल्या.

हा सन्मान श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. एस.पी. थोरात, डॉ. संदीप पाटील, डॉ. ए.एस. कुंभार, डॉ.पी.आर.बागडे व डॉ. ए.एस. महात यांनी स्वीकारला. या उपक्रमात सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, सहा. ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे व रजिस्ट्रार एस.के. धनवडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

epaper.helloprabhat.in
22 Nov 2025 - Page 4

पुण्य नगरी । मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ । कोल्हापूर -

# प्रभावी शिक्षणासाठी एआय तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे : डॉ. पाटील

## विवेकानंद महाविद्यालयात एआय आधारित शिक्षण पद्धतीविषयी कार्यशाळा



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागातर्फे अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज क्लस्टर) योजनेंतर्गत 'AI Powered Teaching & Learning : Aligning with NEP २०२०' या विषयावरील कार्यशाळा पार पडली. बदलत्या शिक्षण पद्धतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथील संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. सचिन पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार Blended Teaching & Learning, Flipped Classroom यासारख्या आधुनिक सुविधांची गरज वाढत आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी काळाच्या बदलांसोबत एआय तंत्रज्ञान आत्मसात करून शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या पद्धती अधिक प्रभावी कराव्या, असेही डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले. दुपारच्या सत्रात सायबर कॉलेजच्या डॉ. रजनी कामत यांनी 'E-Learning' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात संस्था प्रार्थना आणि रोपांना पाणी घालून झाली. प्रास्ताविक आणि स्वागत अग्रणी महाविद्यालय कार्यशाळा समन्वयक डॉ. इरफान मुजावर यांनी केले. आभार संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विशाल वाघमारे यांनी मानले. या कार्यशाळेला अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज क्लस्टर) अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. राजश्री पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा. शुभांगी वेस, प्रा. सोनल अधिकर, प्रा. निकिता हुडे, प्रा. मनीषा दवडे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

पुण्य नगरी ३ | मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये रासायनिक पृथक्करण विषयक कार्यशाळा

### रसायनशास्त्र विभागात 'ॲनालिटिकल टेक्निक्स' विषयावर मार्गदर्शन



**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे Analytical Techniques Application in Pharmaceutical Analysis and Quality Control या विषयावरील कार्यशाळा अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज क्लस्टर) योजनेंतर्गत पार पडली. या कार्यशाळेत बी.एस्सी. आणि एम.एस्सी. (रसायनशास्त्र) अभ्यासक्रमातील विद्यार्थी, तसेच अग्रणी महाविद्यालय योजनेतील इतर महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेत तज्ज्ञ म्हणून डॉ. रवींद्र गायकवाड (भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेज) आणि डॉ. अजित एकल (इन्स्टा व्हिजन, सातारा) यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. औषधनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या विविध ॲनालिटिकल टेक्निक्स, उपकरणांचा उपयोग, औषधांचे रासायनिक पृथक्करण, त्यांचा दर्जा टिकवून ठेवण्याची प्रक्रिया आणि लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. यासोबतच या क्षेत्रातील रोजगारसंधी, तसेच OJT (On Job Training – NEP नुसार) संकल्पना बी.एस्सी. तृतीय वर्ष आणि एम.एस्सी. विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.

कार्यशाळेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, अग्रणी महाविद्यालय समिती समन्वयक डॉ. वर्षा मैंदर्गी आणि विवेकानंद महाविद्यालय अग्रणी महाविद्यालय समन्वयक डॉ. व्ही. बी. वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. रसायनशास्त्र विभाग प्राध्यापक वर्ग, लीड कॉलेज समन्वयक डॉ. ए. एस. तपासे, विभागप्रमुख डॉ. एस. डी. शिर्के, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी कार्यशाळेच्या यशासाठी प्रयत्न केले.

25.11.25

पुण्य नगरी | बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी आणि नियमिततेने यश मिळवावे : उरुणकर

**एज्युकेशनल फेअर व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी कठीण परिस्थितीत योग्य आणि सोपे काय आहे, याचा विचार करून निर्णय घ्यावा. असे निर्णय घेता आले, तर आवडीच्या क्षेत्रात यश मिळते. चांगल्या सवयी, काटेकोर नियम, सुलभ शिस्त आणि नियमितता आयुष्याचा अविभाज्य भाग बनवा, तसेच यशाचा सिद्धांत ठेवून नियमित अभ्यास करण्याची सवय वाढवा, असे मार्गदर्शन व्याख्याते विक्रांत उरुणकर यांनी केले. ज्युनिअर आर्टस्, कॉमर्स विभागातर्फे आयोजित एज्युकेशनल फेअर अंतर्गत व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्युनिअर आर्टस, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले यांनी भूषवले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. स्वागत व प्रास्ताविक प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. आभार प्रा. बी. एस. कोळी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. पी. वंदाते आणि प्रा. अश्विनी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास ज्युनिअर विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास
गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५

# निशा मिटके झाली महसूल सहाय्यक



**जोतिबा** : भाविकांचे कुलाचार विधी पुजा अर्चा करीत पुजाऱ्यांच्या मुलीने यश मिळवले आहे. निशा सुनिल मिटके हीने जोतिबा डोंगर येथील प्राथमिक शाळेत शिक्षण घेऊन माध्यमिक शिक्षणासाठी माले येथील ज्योतिर्लिंग हायस्कूल मध्ये शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर स्वामी विवेकानंद कॉलेज मध्ये बी.एससी पुर्ण करून एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाली. तिची महसुल सहाय्यक पदी निवड झाली. या यशाने तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

# 'विवेकानंद'ला इंटर झोनल महिला, पुरुष बॅडमिंटन स्पर्धेमध्ये दुहेरी मुकुट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, आष्टा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इंटर झोनल महिला व पुरुष बॅडमिंटन स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरच्या महिला व पुरुष बॅडमिंटन संघाने प्रथम क्रमांक मिळवत दुहेरी मुकुटाचे मानकरी ठरले आहेत.

खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले.